# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०९/१०/२०१८ रोजी (का.प.क्र.११) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक ०९/१०/२०१८ रोजी (का.प.क्र.११) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका मुख्यकार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्री.सय्यद मतीन रशीद
०६. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०७. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०८. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०९. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
१०. स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे
११. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
१२. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१३. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१४. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१५. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका श्रीमती.अंजलीताई कोंडेकर यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली देण्यात यावी.

श्रीमती स्वाती नागरे
श्रीमती जयश्री कुलकर्णी : यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका स्व.अंजलीताई कोंडेकर यांचे दुःखद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे २ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.
(यावेळी स्व.अंजली कोंडेकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेने दोन दिवसा अगोदर अचानक पणे महाराणा एजन्सिच्या सेक्युरिटींना का काढण्यात आले? त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी. आणि मायोवेल्स कंपनी बाबत जो सभागृहाने निर्णय घेतला. एकाच वर्षाची मुदत या एजन्सीला देण्यात यावी.

मा.सभापती : या सर्व कामकाजावर देखरेख राहणे गरजेचे आहे. मायोवेल्सचा जो विषय आहे त्याचा दर वर्षीचा कार्य अहवाल स्थायी समितीमध्ये आलेला आहे.

विधी सल्लागार : सेक्युरिटी आणि बिल्डींग इन्स्पेक्टर काढण्यात आले आहे त्याबाबत माझ्याकडुन संचिका पाठवण्यात आली नव्हती. मा.आयुक्तांकडुन आदेश आल्यानंतर त्याप्रमाणे अमलबजावणी करण्यात आली.

श्री.गजानन बारवाल : याची माहिती देण्यात यायला पाहिजे होती. चार कर्मचारीच काढण्यात आले बाकीचे का काढण्यात आले नाही? याची पर्यायी व्यवस्था काय केली आहे?

मा.सभापती : या संदर्भात श्रीमती.थेटे मॅडम आपण मा.आयुक्तांशी चर्चा करुन त्याचा सविस्तर खुलासा स.सदस्यांना देण्यात यावा.

| | |
|---|---|
| श्रीमती.स्वाती नागरे | : वार्डामध्ये पाच दिवसाआड पाणी येत आहे. पाण्याचे महिन्यात दोन-तीन गॅप झाले आहे. सकाळी येणारे पाणी दुपारी येत आहे. |
| मा.सभापती | : पुर्ण शहरामध्ये पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. बऱ्या पैकी पाणी पुरवठा सुरळित झाला होता. परंतु मागच्या एक महिन्यापासुन पाणी पुरवठ्याचे काम शहरामध्ये विस्कळीत झाले आहे. यावर उपाय योजना काय केल्या. |
| कार्य. अभियंता(पा.पु) | : जायकवाडीला लाईटचे प्रोब्लेम व पंपांचे सुध्दा प्रोब्लेम आहेत. एमएसईबी ने shutt down मागितलेले आहे. ते देण्यासाठी नियोजनकरीत आहे. |
| मा.सभापती | : shutt down घेण्यापुर्वी चार दिवस अगोदर सर्व स.नगरसेवकांना याची माहिती दिली पाहिजे. आणि लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरळित कसा होईल त्याकडे लक्ष दिले पाहिजे. |
| श्रीमती.शेख नरगीस | : पाण्यामध्ये जंतू, अळ्या होत आहे त्यासाठी काय नियोजन करणार आहे. वार्डात सहाव्या दिवशी पाणी येत आहे. |
| मा.सभापती | : ज्या ज्या भागातील दुषित पाण्याचा प्रश्न आहे तो तातडीने सॉल केला पाहिजे. |
| श्रीमती.सत्यभामा शिंदे | : माझ्या वार्डात पाण्याचा रेग्युलर गॅप दिला जात आहे. पाणी वेळेवर येत नाही. बाजुला संघर्षनगर मध्ये दोन दोन तास पाणी चालते. खुलासा करण्यात यावा. |
| कार्य. अभियंता(पा.पु) | : दोन तास नाही तर एक तास पर्यंतच पाणी दिले जाते. |
| श्रीमती.नसरीन शेख | : लक्ष्मी कॉलनीमध्ये चार पाच दिवसाआड पाणी येते ते हेही मुबलक नाही. |
| मा.सभापती | : स.सदस्य श्रीमती.नरगीस शेख यांच्या वार्डातील काय अडचण आहे ती दुर करण्यात यावी. |
| श्री.पुनमचंद बमणे | : पुढच्या महिन्यामध्ये हर्सुल देवीची यात्रा आहे. सकाळी चार वाजे पासुन महिला देवीच्या दर्शनासाठी येतात. रस्त्याने पुर्ण अंधार आहे. आता पर्यंत तिथे लाईट लावण्यात आलेले नाही. |
| कार्य.अभियंता(विद्युत) | : दसरा नवरात्रकरिता लाईटची व्यवस्था करण्यात येईल. उद्या पासुन काम सुरु करणार आहोत. |
| श्री.गजानन बारवाल | : याच प्रमाणे कर्णपुराची देवी, बीड बाय पासची रेणुकामाता मंदिर येथे सुध्दा लाईटची व्यवस्था करण्यात यावी. |
| कार्य.अभियंता(विद्युत) | : बीड बाय पास, जळगाव रोड, हर्सुल, कर्णपुरा या सर्व ठिकाणी तात्पुरती लाईटचे काम हाती घेतले आहे. आज पासुन काम सुरु होईल. |
| मा.सभापती | : या सर्व ठिकाणांची विद्युत व्यवस्था आज संध्याकाळ पर्यंत करावी. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : दोन दिवसा अगोदर पुण्यामध्ये होर्डिंगमुळे अपघातामध्ये चार जणांचा मृत्यु झाला. तो प्रकार येथे ही होऊ शकतो. त्या संदर्भात शहरामध्ये अधिकृत आणि अनाधिकृत होर्डिंग्स् किती आहे याची संख्या आज पर्यंत कोणत्याही सदस्यांना कळालेली नाही. मोठ्या इमारतींवर ज्या होर्डिंग्स पडायला आलेल्या आहेत त्याची अवस्था वाईट आहे. याचा कधी सर्व्हे केला आहे का? याची चौकशी करावी आणि ताबडतोब कारवाई करावी. |
| मा.सभापती | : अधिकृत, अनाधिकृत आणि धोकादायक होर्डिंग्स बाबत काय कार्यवाही केली. याचा खुलासा करावा. |
| मालमत्ता अधिकारी | : औरंगाबाद शहरामध्ये अधिकृत ४४८ होर्डिंग्स आहेत. सातारा देवळाई परिसरातील आणि इतर भागातील अनाधिकृत होर्डिंगसच्या बाबतीत शाखा अभियंता यांच्याकडुन सर्व्हे चालु आहे. आणि मा.महापौरांनी ज्या सुचना दिल्या होत्या त्याप्रमाणे कार्यवाही करत आहोत. या कामासाठी १५ दिवस लागतील. |
| मा.सभापती | : काही दुर्घटना घडु नये म्हणुन तातडीने ते काम आठ दिवसात करण्यात यावे. |
| श्री.गजानन बारवाल | : जी दुर्घटना होर्डिंगसच्या बाबतीत घडली ती मोबाईल टॉवर्सच्या बाबतीत सुध्दा घडु शकते. शहरामध्ये किती टॉवर्स आहेत अनधिकृत किती याचा खुलासा करण्यात यावा. |

उपआयुक्त(महसुल) : शहरामध्ये मोबाईल टॉवर्स ४७१ आहेत. त्यातील ८६ ते ८७ टॉवर्सला परवानगी आहे. ताबडतोब कारवाई करण्यासाठी नगर रचना विभागाला सुचना दिलेली आहे. जे अनाधिकृत टॉवर्स उभे आहेत त्यांची स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी चेक करणे आवश्यक आहे.

मा.सभापती : अनाधिकृत टॉवर्स उभे आहेत त्याची स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी पाहण्याचे काम नगररचना विभागाने करावे. आणि जे अनाधिकृत आहेत त्यांना अधिकृत कसे करता येईल ते बघावे.

श्री.सिध्दांत शिरसाट : सातारा येथील रेणुकामाता कमानी जवळ जे ३ एक्करमध्ये अतिक्रमण झालेले आहे ते काढण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे आदेश आलेले आहे. तर कार्यवाही का होत नाही.

मा.सभापती : मा.न्यायालयाने आदेश दिले असेल तर तातडीने कार्यवाही करावी.

श्रीमती.राखी देसरडा : एमएसईबीने १४.०५.२०१८ रोजी महानगरपालिका हद्दीमध्ये विविध जागी अंडर ग्राऊंड केबल टाकण्याची परवानगी प्रशासनाकडे मागीतली होती त्या मागणीनुसार मनपा विद्युत विभागाने ४,६३,७०,८००/- हे पथदीव्याच्या चालु मासिक बिलापोटी वळती करण्यास आपली संमती आहे असे मंजुर पत्र मनपाने एमएसईबी ला दिले. सदर कामास मंजुरी देतांना विद्युत विभागाने ९ झोन ला पत्राद्वारे कळविण्यात आले की उदा. झोन ७ वार्ड क्र.६५ सुराणा नगर इतकाच संदर्भ देऊन सुराणा नगर वार्डात कोणत्या कॉलनीमध्ये कोणत्या रोडवर कोणत्या बाजुला भूमीगत केबल टाकायचे आहे किती फुट खोदणार आहे याचा कोणताही नकाशा न देता एक साधे पत्र प्रत्येक झोनला पाठवून दिले आहे. ही एक फार गंभीर बाब आहे. वार्ड क्र. ६५ एन-१ परिसरामध्ये रोडच्या मधोमध खोदुन केबल टाकण्याचे काम चालू आहे. सदरील ठेकेदारांनी २५ ते ३० नळ कनेक्शन तोडुन टाकले. महानगरपालिकेची मुख्य जलवाहिनी तोडून टाकली त्यामुळे तिथल्या नागरीकांना गेल्या १० दिवसापासून पाणी नाही. काही अपार्टमेंन्टच्या लाईटचे केबल तोडुन टाकल्या. संबंधीत कंत्राटदाराच्या कामाची पहानी करण्यासाठी वार्ड कार्यालयात फोन केले असता वार्ड कार्यालयातून असे उत्तर देण्यात आले की, सदरील कामाचे कोणतेही नकाशे व संबंधीत ठेकेदार कुठे काम करणार आहे. याची माहिती आमच्याकडे नाही. आपण विद्युत विभागाशी संपर्क करावा. विद्युत विभागाशी संपर्क केला असता त्यांच्याकडे कोणत्या ही प्रकारचे नकाशे आढळून आले नाही. महावीतरणाला परवानगी देत असतांना प्रत्येक झोन मध्ये कुठे कुठे केबल टाकायची आहे याची यादी मावितरणाकडुन घेऊन त्या त्या झोन मधुन त्या वार्डात किती खोदकाम होणार आहे व ते खोद काम पूर्ण करण्यासाठी किती पैसे मनपाला लागणार आहे याचा सर्व झोन मधुन एकत्र इस्टीमेन्ट करुन मगच महावितरणाला परवानगी द्यायला पाहिजे होती. शहरातल्या ११५ वार्डामध्ये अंडर ग्राऊंड केबल टाकण्याची परवानगी दिली आहे. ११५ वार्डात खोदकाम केल्या नंतर त्या रस्त्याची डागडुगी करण्यासाठी फक्त ४,६२,७०,८००/- रुपये महावितरणाकडून घेण्यात येणार आहे किंवा वळती करण्यात येणार आहे. वार्ड क्र.६५ चाच विचार केला असता जवळपास आतापर्यंत काम केलेले त्याला डागडुजी करण्यासाठी १५ते२० लाख रुपये खर्च होणार आहे व संपूर्ण वार्डाचे काम केल्या नंतर जवळ पास ६०ते७० लाख रुपये खर्च होईल तर शहराच्या ११५ वार्डात डागडुजी करण्यासाठी १५ ते २० कोटी रुपये खर्च होईल. आपण फक्त ४,६२,७०,८००/- रु वळती करुन घेत आहोत. या संपूर्ण कामाची महावितरणाला जी परवानगी दिली आहे त्या परवानगीची मा.मुख्य लेखा परिक्षणाकडून चौकशी करण्याचे आदेश द्यावे व तो पर्यंत संपूर्ण शहरात चालू असलेले महावितरणचे काम थांबवावे असे आदेश द्यावे.

मा.अति.आयुक्त : या संदर्भात मे महिन्यात ठरले होते की, प्रत्येक वार्ड निहाय ते नकाशे देणार होते. ठरल्याप्रमाणे काम झाले नसेल तर त्याची चौकशी करण्यात येईल.

मा.सभापती : प्रत्येक वार्डात हे काम होत असतांना यांच्यावर कोणाचे नियंत्रण आहे का? याबाबत अधिकारी नियुक्त केले पाहिजे. जेवढा खर्च रस्ते दुरुस्तीला येणार आहे तेवढी रक्कम

भरुन घेतली पाहिजे. काम झाल्यावर ताबडतोब त्या रक्कमेमधुन ते रस्ते दुरुस्त झाले पाहिजे अशा पध्दतीच्या सुचना संबंधीत विभागाला देण्यात येते.

श्री.रुपचंद वाघमारे : ३-४ वर्षापासुन प्रकल्प विभागात सुवर्ण जयंती योजना बँकेमार्फत राबवतो. तीन वर्षापासुन त्या योजनेत किती लाभार्थी अर्ज आलेले आहे? आणि किती संचिका मंजुरी आलेल्या आहेत? आता पर्यंत किती लोकांना वाटण्यात आले आहे?

उपआयुक्त(महसुल) : जे दारिद्रय रेषेखालचे लोक आहेत त्यांना कर्ज वाटप केले जाते. वैयक्तिक आणि बचत गट यासाठी आर्थिक वर्षामध्ये जे कर्ज वाटप करायचे आहे याची यादी देण्यासाठी सर्व स.सदस्यांना पत्र दिलेले आहे.

श्री.रुपचंद वाघमारे : दर वर्षी किती लाभार्थींना कर्ज देण्याचे टारगेट असतो आणि टारगेट दिल्याच्या नंतर किती फाईलस् मंजुर झाल्या आणि किती लोकांना कर्ज वाटले आहेत?

उपआयुक्त(महसुल) : सविस्तर माहिती पुढच्या बैठकीत यादीसह देण्यात येईल.

मा.सभापती : या प्रकरणी शासनाला योग्य स्वरुपात कळवले पाहिजे. शहराचे सर्व्हेक्शन केले असता याची संख्या खुप पटीने जास्त आहे. त्यामुळे सर्वेक्शन पुन्हा होण्याच्या दृष्टिने काही करता येत असेल तर केले पाहिजे.

श्री.सय्यद मतीन : रोशन गेटच्या डीपी रस्त्याचे चे काय झाले? विद्युत पोल, डीपी काढण्यासाठी वारंवार तक्रारी विद्युत विभागात केलेली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : रोशन गेटच्या डीपीची काय अडचण आहे याबाबत खुलासा करावा.

कार्य.अभियंता(विद्युत) : रोशन गेटच्या संबंधीत एमएईबी सोबत सर्व्हे झालेला आहे. २ लाखाचे डीपीचे कोटेशन आणुन अकाउंट विभागामध्ये मंजुरीस्तव आहे. त्वरित काढण्याकरिता कार्यवाही करत आहे.

मा.सभापती : श्री.केंद्रे आपण एमएईबी चे कोटेशन आलेले आहेत त्या संदर्भात ताबडतोब पैसे भरण्याची व्यवस्था होईल ते बघण्यात यावे.

श्री.सय्यद मतीन : मास्टर प्लॅनमध्ये लोकांची घरे जात आहे. लोक टीडीआरची अपेक्षा करतात. अभिप्रायसाठी २०-२० दिवस फाईल थांबते. लोक टीडीआरसाठी खुप अडचणीत आहेत.

मा.सभापती : श्रीमती.मुथा मॅडम यांच्याकडे खुप कामाचा बोजा आहे. हा विभाग टेक्निकल लोकांकडे ठेवला तर काही अडचणी असतील ते लोक तातडीने एकमेकांशी बोलुन दुरुस्त करुन घेऊ शकतील. त्यामुळे त्यांच्याकडे अतिरिक्त लोड न देता हा विभाग सुध्दा टेक्निकल पर्सन लोकांकडे देता आले तर प्रयत्न करावे.

श्रीमती.नसरीन बेगम : कोहिनुर कॉलनीमध्ये एक जिम आहे. ते बंद करुन तिथे वाचनालय करण्यात यावे.

मा.सभापती : या संदर्भात आयुक्तांच्या संबंधीत एक नोटिस सुध्दा देण्यात आलेली आहे. तातडीने कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

श्री.अब्दुल नाविद : पुर्ण शहरामध्ये किती वाचनालय आहेत आणि त्यामध्ये उर्दु वाचनालय किती आहे? याची माहिती देण्यात यावी. दर वर्षीच्या बजेटमध्ये प्रत्येक वाचनालयासाठी पैश्यांची तरतुद करण्यात येते. शासनाकडुन सुध्दा अनुदान मिळते. माझ्या माहिती प्रमाणे सन २००२ पासुन उर्दु वाचनालयासाठी कोणत्या प्रकारचे अनुदान मिळालेले नाही.

मा.सभापती : या विषयामध्ये मा.आयुक्तांना सुचना करण्यात येते. मा.आयुक्त यांनी सर्व वार्डामध्ये वाचनालय उघडण्यासाठी पुढाकार घेत आहेत. उर्दु विषयाच्या संदर्भात वाचनालयाच्या काही अडचणी असतील तर त्या तातडीने सोडवण्याच्या संबंधीत अधिकाऱ्यांना सुचना करण्यात येते.

श्रीमती.सायरा बानो : वार्डातील कॉलनीमधील वाचनालय बंद का करण्यात आले? याचा खुलासा करण्यात यावा.

मा.अति.आयुक्त : कॉलनीमधील वाचनालय शाळेचे सुरु असल्यामुळे ते बंद आहे. लवकरात लवकर ते सुरु करण्यात येईल.

मा.सभापती : ज्या ज्या वार्डातील नगरसेवकांचे म्हणणे असेल त्या त्या पध्दतीने वाचनालय सुरु करण्याच्या दृष्टिने कार्यवाही होईल.

श्रीमती.राखी देसरडा : केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटीमधून औरंगाबाद शहराची निवड झाली आहे. स्मार्ट सिटी मधून पहिल्यांदा चिकलठाणा येथे अडीचशे एक्करावर ग्रीन फील्ड प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता मात्र संचालक मंडळाने शहरातील नागरीकांना सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी स्मार्ट सिटी मधला निधी पॅन सिटीत वळविण्याचा निर्णय घेतला आहे. वर्तमान पत्राच्या माध्यमातून असे कळाले की, कालच मा.महापौर व सर्व पदाधिकारी व मा.आयुक्त यांनी एक बैठक घेऊन ३०० कोटी रुपयाचे शहरातील ऐतिहासिक वास्तूचे जतन, सवंर्धन आणि सौदर्यकरण करण्यासाठी खर्च करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर आहे. या अगोदर ही मनपाने मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करुन ऐतिहासिक वास्तूचे जतन केले आहे. परंतु याही पेक्षा शहरात पाण्याची भिषण परिस्थिती निर्माण होत आहे. ५ दिवसाआड पाणी येत आहे. व समांतर जलवाहिनी कामाचा वाद न्यायप्रविष्ट आहे. ज्या दिवशी कोणाकडुनही निकाल लागेल त्या दिवशी जरी काम सुरु झाले तर शहरात समांतरच पाणी येण्यासाठी ३ वर्षाचे कार्यकाळ लागणार आहे. शहरातील समस्याचा क्रमवार जर ठरवला तर पाणी समस्या ही एक नंबरच्या समस्थेवर येईल. त्यामुळे स्मार्ट सिटी मधील ३०० कोटी रुपये ऐतिहासिक वास्तूचे जतन, संवर्धन आणि सौंदर्याकरण करण्यासाठी जे खर्च करीत आहे ते ३०० कोटी रुपये समांतर जलवाहिनी टाकण्यासाठी करता येऊ शकते असा विचार मा.पदाधिकारी व मा.आयुक्तांनी करावा.

मा.सभापती : ग्रीन फिल्ड डेव्हल्पमेन्ट त्यातला बेसिक पार्ट आहे. तो बदलण्याचा अधिकार कोणालाही नाही. त्यामुळे ते फंड वळवण्यात आलेले नाही.

श्रीमती.राखी देसरडा : परंतु तशी माहिती मिळालेली आहे.

मा.सभापती : चुकीची माहिती मिळाली आहे. पाणी प्रश्नासाठी स्मार्ट सिटीमधुन वापरता येत असतील ते निश्चित पणे वापरले पाहिजे. केंद्र शासनाने ठरवुन दिलेल्या पध्दतीने स्पेशल परपल तयार केलेले आहे. आणि हा अधिकार त्या बोर्डाने निर्णय घेऊन करायचा आहे. स्थायी समितीला त्या बाबतीत कुठलाही अधिकार नाही.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकरः नगररचना विभाग आणि अतिक्रमण विभाग एकत्रित केलेले आहे. मा.आयुक्तांनी काय धोरण ठेवुन त्या विभागांचे एकत्रिकरण केले आहे.

मा.सभापती : हा मा.आयुक्तांचा निर्णय आहे. याबाबतीत मा.आयुक्त सांगु शकतील.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकरः माझ्या वार्डातील राखी टावर्सचे छोट्याच्या पुलाचे काम दोन वर्षापासुन चालु आहे कारण कॉन्ट्रॅक्टरचे बिल निघत नाही म्हणुन. सगळ्यात जास्त वसुली होणारा नगररचना आणि अतिक्रमण विभाग आहे. त्यांच्याकडुन अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. कॉन्ट्रॅक्टर अधिकारी, पदाधिकाऱ्यांचे सुध्दा ऐकत नाही. जो कॉन्ट्रॅक्टर दिलेल्या मुदतीमध्ये काम करत नाही त्या कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅक लिस्ट करण्यात यावे. असे आदेशित करावे.

मा.सभापती : या संदर्भात मा.आयुक्त मी स्वतः लेखी पत्र दिले आहे. या संदर्भात दर आठ दिवसाला बैठक घेऊन टारगेट देऊ. कुठल्याही परिस्थितीत वसुली ही झालीच पाहिजे. यामध्ये मा.आयुक्तांनी नगररचना विभागातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. कुठल्याही नागरीकाला त्रास होऊ नये, १५ दिवसाच्यावर कुठल्याही टेबलवर फाईल प्रलंबित असु नये, तातडीने सगळ्या संचिका मार्गी लागल्या पाहिजे अशा पध्दतीच्या सुचना स्वतः मा.आयुक्तांनी दिल्या आहेत.

श्रीमती.शेख नरगीस : नेहरुनगर, कटकट गेट जवळ हॉस्पिटल आहे. तिथे वाचमॅन नाही, स्टाफ नाही. हॉस्पिटलचे पंखे सुध्दा बंद आहे. वारंवार सुचना करुन सुध्दा कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अति.आयुक्त : पंखे बंद असतील तर ते दुरुस्त करुन दिले जातील. आणि कर्मचारी सुध्दा देण्यात येतील. मशिनरी टेंडरमध्ये आहे. मशिनरी येताच स्टाफ देण्यात येईल. सुरक्षा रक्षक देण्यात आले आहे.

**विषय क्र. ९७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.मनोज रमेश पाटील, कनिष्ठ लिपीक, मालमत्ता विभाग यांनी त्यांचा मुलगा सर्वेश मनोज पाटील याच्या हृदयाच्या आजारपणावर (Large Ostium Secundum Atrial Septal Defect) उपचारासाठी अग्रीम रू.१,५०,०००/- (अक्षरी रू.एक लाख पन्नास हजार मात्र) मंजूर करून पुना हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, पुणे यांना अदा करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने सदर अग्रीमाचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी दाखल केलेल्या वैद्यकीय देयक रू.३,११,०८९/- पैकी अनुज्ञेय रू.२,८२,२१५/- च्या ९०% रक्कम रू.२,५३,९९३/- (अक्षरी रू.दोन लाख त्रेपन्न हजार नऊशे त्र्यान्नव मात्र) पैकी ५% रक्कम रू.१५,५५४/- (अक्षरी रू.पंधरा हजार पाचशे चोपन्न मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.३,११,०८९/- च्या ५% प्रमाणे ) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.२,३८,४३९/- (अक्षरी रू.दोन लाख अडोतीस हजार चारशे एकोणचाळीस मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत तसेच सदर खर्चामधून अग्रिम रक्कम रू.१,५०,०००/- वजा जाता, सदर रकमेचे समायोजन करून उर्वरीत फरकाची रक्कम रू.८८,४३९/- (अक्षरी रू.अठ्यांशी हजार चारशे एकोणचाळीस मात्र) संबंधीतास अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.९७ मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.मनोज रमेश पाटील, कनिष्ठ लिपीक, मालमत्ता विभाग यांनी त्यांचा मुलगा सर्वेश मनोज पाटील याच्या हृदयाच्या आजारपणावर (Large Ostium Secundum Atrial Septal Defect) उपचारासाठी पुना हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, पुणे येथे केलेल्या उपचारावरील अग्रीमाचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी दाखल केलेल्या वैद्यकीय देयक रू.३,११,०८९/- पैकी अनुज्ञेय रू.२,८२,२१५/- च्या ९०% रक्कम रू.२,५३,९९३/- (अक्षरी रू.दोन लाख त्रेपन्न हजार नऊशे त्र्यान्नव मात्र) पैकी ५% रक्कम रू.१५,५५४/- (अक्षरी रू.पंधरा हजार पाचशे चोपन्न मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.३,११,०८९/- च्या ५% प्रमाणे ) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.२,३८,४३९/- (अक्षरी रू.दोन लाख अडोतीस हजार चारशे एकोणचाळीस मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते, तसेच सदर खर्चामधून अग्रिम रक्कम रू.१,५०,०००/- वजा जाता, सदर रकमेचे समायोजन करून उर्वरीत फरकाची रक्कम रू.८८,४३९/- (अक्षरी रू.अठ्यांशी हजार चारशे एकोणचाळीस मात्र) संबंधीतास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८ :**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.संध्या गोपाळ टाकळीकर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या पतीच्या नामे डॉ.सुहास लक्ष्मण जेवळकीर Acute Calcus Cholecystitis with Acute pain in Abdemen with Diabetic Ketoacidosis with HTN/CKD (तीव्र उदर वेदना, रक्तदाब) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून रक्कम रूपये ४,८९,४८२/- (चार लाख एकोणनव्वद हजार चारशे ब्याऐंशी रूपये फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली असून त्यांना तीव्र उदर वेदना, रक्तदाब Acute Calcus Cholecystitis with Acute pain in Abdemen with Diabetic Ketoacidosis with HTN/CKD उपचारार्थ एकूण केलेला खर्च रक्कम रू.४,८९,४८२/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.१४,०८४/- वजा जाता रू.४,७५,३९८/- शिल्लक राहते. शिल्लक

रक्कमेच्या ९०% रू.४,२७,८५८/- इतकी होते. एकूण खर्चाच्या ५% रक्कम रू.२४,४७४/- ही मनपा फंडात जमा करून मंजूर देय रक्कम रू.४,०३,३८४/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभग क्र.२०१४/प्र.क्र.२९२/१४/राकावि-२/मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक १९ एप्रिल २०१८ अन्वये शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रूग्णालयाचे नांव समाविष्ट आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता डॉ.संध्या गोपाळ टाकळीकर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या रू.४,०३,३८४/- (चार लाख तीन हजार तीनशे चौऱ्यांशी रूपये फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

मा.सभापती : विषय क्र.९८ मंजुर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.संध्या गोपाळ टाकळीकर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या पतीच्या नामे डॉ.सुहास लक्ष्मण जेवळकीर Acute Calcus Cholecystitis with Acute pain in Abdemen with Diabetic Ketoacidosis with HTN/CKD (तीव्र उदर वेदना, रक्तदाब) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे केलेल्या उपचारावरील खर्च रक्कम रू.४,८९,४८२/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.१४,०८४/- वजा जाता रू.४,७५,३९८/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या ९०% रू.४,२७,८५८/- इतकी होते. एकूण खर्चाच्या ५% रक्कम रू.२४,४७४/- ही मनपा फंडात जमा करून मंजूर देय रक्कम रू.४,०३,३८४/- संबंधीतास अदा करणेस व संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला चिकलठाणा आठवडी बाजारासाठी कार्यालयीन जा.क्र./मनपा/मामअ/९०२/२०१७ दि.२८/१२/२०१७ अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता सदर आठवडी बाजारच्या एकूण ०४ निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा लेखाधिकारी व मालमत्ता अधिकारी यांचे समक्ष दि.१७/०१/२०१८ रोजी उघडण्यात आल्या, त्याचे दर खालीलप्रमाणे.

**चिकलठाणा आठवडी बाजार –**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | प्रति बाजार प्राप्त निविदा दर रक्कम रूपये |
|---|---|---|
| ०१. | श्री.गिरधारे राहुल राजु | २४,५००/- |
| ०२. | श्री.संतोष राजु कांबळे | १९,७२५/- |
| ०३. | श्री.संदीप बनारसी रिडलॉन | १९,६१२/- |
| ०४. | श्री.राजेश जनार्धन जाधव | १४,७१५/- |

उपरोक्त सदर आठवडी बाजार करीता एकूण ०४ निविदा प्राप्त झालेल्या असून तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.२४,५००/- प्रती बाजार असून निविदा श्री.गिरधारे राहुल राजु यांची आहे. या निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

करीता मंजुरी प्रमाणे चिकलठाणा आठवडी बाजारासाठी प्राप्त सर्वात जास्त दराची निविदा श्री.गिरधारे राहुल राजु यांची रक्कम रू.२४,५००/- प्रती बाजार दराने मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

श्री.गजानन बारवाल : केव्हा पासुन हे टेंडर देण्यात आले नव्हते याचा खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता विभाग : सन २०१६-१७ ला निविदा झाली होती. सन २०१७-१८ मधे तीन वेळेस निविदा द्यावी लागली. तीसऱ्यांदा प्रतिसाद मिळाल्या नंतर निविदा आली आहे.

मा.सभापती : या दरम्यानच्या काळामध्ये वसुली कोण करत होते.

मालमत्ता विभाग : वसुली मागिल ठेकेदारच करत होते. संचिकेवर मान्यता घेतलेली आहे.

मा.सभापती : स्थायी समितीसमोर हा विषय आलेला नाही. त्यांनी मान्यता कोणाची घेतली?

मालमत्ता विभाग : विभाग प्रमुखांची मान्यता घेतलेली होती.

मा.सभापती : विभाग प्रमुखांच्या परवानगीने हे चालत नाही. याला सभागृहाची परवानगी लागते.

श्रीमत.सायरा बानो : सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी नाही मिळाली. स्थायी समितीमध्ये मंजुरी नाही. हा विषय स्थगित करण्यात यावा.

मा.सभापती : या बाबतीत जे कोणी दोषी असेल ज्यांनी संचिका लिहिल्या मा.आयुक्तांना सुचना करण्यात येते की, या संचिका आपल्याकडे मागवा, याचा पुर्ण अभ्यास करा आणि जो कोणी दोषी असेल त्याच्यावर तातडीने कारवाई झाली पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : हा विषय स्थगित करण्यात यावा.

मा.सभापती : या विषयासंबंधी निविदांचे दर कमी आलेले आहे. या आठवडी बाजारासाठी तीन दिवसाची फेरनिविदा करण्यांत यावी, दर वाढून मिळतील.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, चिकलठाणा आठवडी बाजारासाठी प्राप्त निविदांचे दर कमी आलेले असल्यामुळे, चिकलठाणा आठवडी बाजारासाठी तीन दिवसांची फेरनिविदा तात्काळ प्रसिध्द करण्यांत यावी, असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. १०० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य टप्पा-२ राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक ११.१.२००७ विषय क्रं. ६५५/४ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील कार्यक्रम २००७ ते २०१२ या कालावधीकरिता होता. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मनपातर्फे प्रकल्पाचा भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र जा.क्र. राकुकका/अर्बन आरसीएच/कक्ष-१७/२०१७२-४४/०७ दिनांक २६.३.२००७ प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यु व बालमृत्यु एकुण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरिता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. मा.स्थायी समिती सभा दिनांक २०/०३/२०१८ विषय क्रमांक ३३९ अन्वये आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत एकुण २७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ६.२.२०१८ ते ३१.७.२०१८ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील मुदतवाढ दिनांक ३१.७.२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न ठेवल्यास आरोग्य सेवा विस्कळीत होईल. यामुळे सर्व पदांची आवश्यकता आहे. सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या ठराविक वेतनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | नांव | पदनाम | ठराविक वेतन |
|---|---|---|---|
| १. | डॉ. वैशाली मुदगडकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु. २८३५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती जया उघडे | स्टाफ नर्स | रु. १२०००/- |
| ३. | श्रीमती सुनिता गणपत नरवडे | स्टाफ नर्स | रु. १२०००/- |
| ४. | श्रीमती विद्या राजु शर्मा | स्टाफ नर्स | रु. १२०००/- |
| ५. | श्रीमती ज्योती रामचंद्र बनकर | स्टाफ नर्स | रु. १२०००/- |
| ६. | श्रीमती मेरी पाखरे | स्टाफ नर्स | रु. १२०००/- |
| ७. | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु. ८६४०/- |
| ८. | श्रीमती द्रौपदी डक | एएनएम | रु. ८६४०/- |
| ९. | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु. ८६४०/- |
| १०. | श्रीमती मिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु. ८६४०/- |
| ११. | श्रीमती रेखा नायमाने | एएनएम | रु. ८६४०/- |
| १२. | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु. ८६४०/- |
| १३. | श्रीमती सोनाली पावलस भिसे | एएनएम | रु. ८६४०/- |
| १४. | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु. ८६४०/- |
| १५. | श्रीमती वर्षा महादू सोनवणे | एएनएम | रु. ८६४०/- |
| १६. | श्रीमती सुनंदा नामदेव चव्हाण | एएनएम | रु. ८६४०/- |
| १७. | श्रीमती सारिका मनोहर इंगळे | एएनएम | रु. ८६४०/- |
| १८. | श्रीमती कविता चव्हाण | एएनएम | रु. ८६४०/- |
| १९. | श्रीमती वैशाली चिंतामण बिऱ्हारे | एएनएम | रु. ८६४०/- |
| २०. | श्रीमती सिमा अरुण गुरव | एएनएम | रु. ८६४०/- |
| २१. | श्रीमती समिनाबेगम शेख सलीम | एएनएम | रु. ८६४०/- |
| २२. | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुले | एएनएम | रु. ८६४०/- |
| २३. | श्रीमती आरती एकनाथ वाघमारे | एएनएम | रु. ८६४०/- |
| २४. | श्रीमती अश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु. ८६४०/- |
| २५. | श्रीमती प्रियंका चंद्रकांत मगरे | एएनएम | रु. ८६४०/- |
| २६. | श्रीमती अग्नेस जे. मकासरे | एएनएम | रु. ८६४०/- |

डॉ. ॠता आनंदगांवकर, महिला वैद्यकीय अधिकारी वैयक्तिक कारणास्तव राजीनामा दिलेला आहे. राजीनामा मंजूर करणे. सध्या कार्यरत १ वैद्यकीय अधिकारी व २५ कर्मचारी यांना वेतनाकरिता रु.२,६१,१५०/- व वार्षिक खर्च रु.३१,३३,८००/- अपेक्षित आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प माता व बाल संगोपन (आरसीएच) या घटकामध्ये करण्यात आलेली आहे. आरसीएच-२ अंतर्गत सध्या कार्यरत १ अधिकारी व २५ कर्मचारी यांना प्रस्तावित केल्यानुसार २ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दिनांक ३.८.२०१८ ते ३१.१.२०१९ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : याची मुदत कधी पर्यंत संपणार आहे.

आरोग्य वैद्य.अधिकारी : दि.३१.०७.२०१८ ला मुदत संपणार आहे.

मा.सभापती : मुदत संपल्यानंतर विषय आला आहे. आधिचा रद्द केला त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला कोण देणार? विभागाला स्पष्ट सुचना देण्यात येते की, मुदतीपुर्व मुदतवाढीचे प्रस्ताव आले पाहिजे अन्यतः त्याला मंजुरी दिली जाणार नाही. विषय क्र.१०० मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य टप्पा-२ राबविण्यासाठी आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत ठराविक वेतनावरील अ.क्र.०१ ते २६ एकूण २६ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दिनांक ३.८.२०१८ ते ३१.१.२०१९ या कालावधी करिता मुदतवाढ देण्यास तसेच सध्या कार्यरत १ वैद्यकीय अधिकारी व २५ कर्मचारी यांचेवरील वेतनाकरिता येणाऱ्या मासिक रु.२,६१,१५०/- व वार्षिक खर्च रु.३१,३३,८००/- या अपेक्षित खर्चास मंजूरी देण्यांत येते. तसेच वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात दररोज सरासरी ४५० मेट्रीक टन घनकचऱ्याची उत्पत्ती होते. दररोज उत्पत्ती होणाऱ्या घनकचऱ्याची वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेकडे स्वतःचे ०६ हुकलोडर्स, ०७ स्कीपलोडर्स, १५ टिप्पर्स ही वाहने आहेत. तसेच वाहनात घनकचरा भरण्यासाठी ०५ ट्रॅक्टर लोडर्स व ०६ जेसीबी मशिन्स आहेत. तथापी नारेगाव डंपिंग ग्राऊंड बंद झाल्यानंतर वार्ड कार्यालयामार्फत ओला कचरा कांचनवाडी, पडेगाव, हर्सुल, चिकलठाणा इत्यादी नियोजीत घनकचरा प्रक्रिया केंद्राच्या ठिकाणी पाठविण्यात येत असून, अनेकवेळा त्या परिसरातील नागरीकांच्या विरोधामुळे दररोज उत्पत्ती होणारा घनकचरा नियोजीत प्रक्रिया स्थळावर घेवून जाणे शक्य होत नाही. क्ष्यामुळे मोठ्या प्रमाणावर घनकचरा शहरात साचून राहतो. सदरील जास्तीच्या घनकचरा उचलण्यासाठी खाजगी वाहने व जेसीबी मशिन्सची आवश्यकता पडते. या व्यतिरिक्त सुका कचरा चितेगांव येथे खाजगी कंपनीत प्रक्रियेसाठी पाठविण्यात येत असून, सुका कचऱ्याच्या वाहतुकीसाठी जास्तीचे अंतर कापावे लागत असल्यामुळे व वाहने अनलोड करण्यासाठी वेटींग करावे लागत असल्यामुळे मनपाची बहुतांशी वाहने सध्या सुका कचऱ्याच्या वाहतुकीसाठी कार्यरत आहेत. त्यामुळे ओला कचऱ्याच्या वाहतुकीसाठी खाजगी टिप्पर्स, हायवा, ट्रॅक्टर्सची व वाहनात घनकचरा भरण्यासाठी खाजगी जेसीबी मशिन्सची वेळोवेळी वार्ड कार्यालयाकडून मागणी होत आहे. नागरी आरोग्याच्या दृष्टीने शहरातील विविध प्रभागात साचलेला घनकचरा लवकरात लवकर उचलणे आवश्यक असल्यामुळे घनकचरा कक्षाच्या व वार्ड कार्यालयांच्या मागणी प्रमाणे तातडीने अतिरिक्त वाहने उपलब्ध करून द्यावी लागत आहेत.

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी एकाच एजन्सी मार्फत घनकचरा संकलन व वाहतुकीचे काम करून घेण्यासाठी कार्यालयीन कार्यवाही करण्यात येत आहे. तथापी नवीन एजन्सीच्या नियुक्ती

पर्यंत सदरील खाजगी वाहने आवश्यकतेनुसार किरायाने घ्यावी लागणार असून,त्यासाठी रू.१,१५,२७,३४४/- खर्च अपेक्षीत आहे. कामाची निकड लक्षात घेवून महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ नुसार अर्थसंकल्पातील इतर तरतूद कमी करून घनकचरा वाहतुकीसाठी वाहने किरायाने घेण्यासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

करीता घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी वाहने व मशिनरी किरायाने घेण्यासाठी रू.१,१५,२७,३४४/- आर्थिक तरतुद उपलब्ध करून देणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

यांत्रिकी विभाग : नारेगाव बंद झाल्या नंतर इतर ठिकाणी कचरा विघ्नटन करणेसाठी एक्स्ट्रा मशिन लागणार आहे.

श्रीमती.सायरा बानो : हा विषय कार्योतर मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे का?

मा.सभापती : घनकचरा व्यवस्थापनेसाठी करोडो रुपये खर्च करत असतांना यात जी रक्कम आहे त्याची अतिरिक्त आवश्यकता काय आहे?

उपअभियंता (यांत्रिकी) : जो पर्यंत नवीन एजन्सी नियुक्त होत नाही तो पर्यंत प्रोजेक्ट ठेवावे लागणार आहे.

श्री.गजानन बारवाल : अनेक टिप्पर्स, अनेक ट्रॅक्टर, अनेक जेसीबी घेतले त्याचे पेमेंट केलेले नाहीत का? याच्यातुन ते पेमेंट करणार आहात का?

यांत्रिकी विभाग : नाले सफाईच्या दिलेल्या मंजुर दराने गाड्या घेतलेल्या आहेत. तीन तीन शिफ्टला वाहने उभी राहते.

श्री.गजानन बारवाल : महापालिकेच्या बाजुला पाच पाच दिवस वाहने उभी असतात. तरी सुध्दा त्यांचे भाडे चालु असते.

मा.सभापती : गाड्या उभ्या का असतात याचा खुलासा करावा.

यांत्रिकी विभाग : कचरा टाकण्यासाठी जागा नाही. नागरीकांचा विरोध होतो. अपलोड करणे शक्य नाही झाले तेव्हाच गाड्या उभे असतात. सध्या १५ टिप्पर, पाच हायवा, चार जेसीबी आणि तीन पोकलेन चालु आहे. जे जे बिल येणार आहेत त्यास स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेणार आहोत.

मा.सभापती : विषय क्र.१०१ स्थगित करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. १०२ :</u>**

विषय :- झोन क्र.३ अंतर्गत विविध रस्त्याची दुरूस्ती व डांबरी पॅचवर्क करणे बाबत या कामाचे ठेकेदार श्री.व्ही.बी.ए.इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१२% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४९,३८,५४०/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.२०१७-AMCA-261658-4

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०३ |
| २ | कामाचे स्वरुप | रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ४९,४४,४७४/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ४९,३८,५४०/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | तत्कालीन ई-निविदा विभागामार्फत |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | तत्कालीन ई-निविदा विभागामार्फत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १५/०३/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०२ |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.व्हि.बी.ए. इन्फ्रा | ४९,३८,५४०/- | ०.१२ % कमी दराने |
| ०२. | श्री.ए.एस.कन्स्ट्रक्शन | ५२,४१,१४२/- | ६% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | रस्ते दुरूस्ती पॅचवर्क |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | स्थायी समिती सभा दिनांक / / २०१७ विषय क्र.७२ |

तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.व्हि.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१२% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४९,३८,५४०/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.३ अंतर्गत विविध रस्त्याची दुरूस्ती व डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक या कामाचे ठेकेदार श्री.व्ही.बी.ए.इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१२% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४९,३८,५४०/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३ :**

विषय :वार्ड क्र.३४ आरतीनगर मिसरवाडी मधील कब्रस्तानमध्ये संरक्षण भिंत,गेट बनविणे व सुशोभिकरण करणे व रंगरंगोटी करणे,या कामाचे ठेकेदार मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.८२% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रु.४६,४९,९१३/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ :- टेंडर क्रमांक/Tender ID-2018-AMCA-284139-4

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३४ आरतीनगर मिसरवाडी मधील कब्रस्तानमध्ये संरक्षण भिंत, गेट बनविणे व सुशोभिकरण करणे व रंगरंगोटी करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक ०७/०२/२०१८ विषय क्र.२७८ र.रू.४८,६८,५१०/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.४६,४९,९१३/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |

| | | |
|---|---|---|
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २५/०४/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०४/०५/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक निविदा |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी | र.रू.४९,६७,०३७/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.८२% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | स्मशानभूमी विकास करणे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.८२% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रु.४९,६७,०३७/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३४ आरतीनगर मिसरवाडी मधील कब्रस्तानमध्ये संरक्षण भिंत, गेट बनविणे व सुशोभिकरण करणे व रंगरंगोटी करणे, या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.८२% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रु.४९,६७,०३७/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०४ :</u>**

विषय :- महानगरपालिकेच्या टाटा कंपनीच्या वाहनांसाठी स्पेअर पार्ट खरेदी करणे या कामासाठी मे.जैन ट्रेडर्स, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा म्हणजेच कंपनी प्राईज लिस्ट पेक्षा १% कमी दराची निविदा स्विकृत करणे बाबत मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ :- Tender ID : 2018-AMCA-268862-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | विभाग प्रमुख (यांत्रिकी विभाग) |
| २ | कामाचे स्वरुप | महानगरपालिकेच्या वाहनांसाठी टाटा कंपनीच्या स्पेअर पार्ट पुरवठा करणे बाबत.(वार्षिक करार) |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय/ स्थायी समिती सभेचा विषय क्र.९८ दि.१३/०९/२०१७ र.रू.४०.०० लक्ष |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.४०,००,०००/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | (www.mahatenders.gov.in) दि.०८/०१/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.०८/०१/२०१८ ते ०१/०२/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.०९/०४/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एकूण ०३ टेंडर |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रूपये | टक्केवारी |
| ०१. | मे.जैन ट्रेडर्स, औरंगाबाद | ३९.६० लक्ष | ४०००० कमी | १% कमी |
| ०२. | मे.दोषी मोटर्स, औरंगाबाद | ४०.४० लक्ष | ४०००० जास्त | १% जास्त |
| ०३. | मे.महावीर ॲटो सर्व्हीसेस औरंगाबाद | ४०.६० लक्ष | ६०००० जास्त | १.५ % जास्त |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | वाहन देखभाल दुरूस्ती |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी महानगरपालिकेच्या टाटा कंपनीच्या वाहनांसाठी स्पेअर पार्टस टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.जैन ट्रेडर्स, औरंगाबाद यांच्याकडून कंपनी प्राईज लिस्ट पेक्षा १% कमी दराने वार्षिक दर करार करून खरेदी करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत. | | |

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या टाटा कंपनीच्या वाहनांसाठी स्पेअर पार्ट खरेदी करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.जैन ट्रेडर्स, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा म्हणजेच कंपनी प्राईज लिस्ट पेक्षा १% कमी दराची निविदा स्विकृत करणेस व मे.जैन ट्रेडर्स, औरंगाबाद यांच्याकडून कंपनी प्राईज लिस्ट पेक्षा १% कमी दराने वार्षिक दर करार करून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०५ :</u>**

विषय :- वार्ड क्र.८१ महाजन कॉलनी सिडको एन-२ येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा मैदानावर कचरा प्रक्रीया करण्यासाठी काँक्रीट प्लॅटफॉर्म बसविणे तसेच रस्ता तयार करणे, या कामाचे ठेकेदार मे.महेश इन्टरप्राईजेस यांचेकडून अं.प. दराने म्हणजेच टेंडर र.रु.३४,२९,१४३.८६/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.२०१८-AMCA-३०६६३३-१

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.०६ |
| २ | कामाचे स्वरुप | कचरा प्रक्रीयासाठी काँक्रीट प्लॅटफॉर्म बसविणे तसेच रस्ता तयार करणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३४२९१४३.८६/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई महासेल निविदा सूचना<br>दिनांक ०५/०४/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २३/०३/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०३ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.महेश इन्टरप्राईजेस | ३४२९१४३.८६ | अं.प. दराने |
| ०२. | मे.अरोही कन्स्ट्रक्शन | ३४९७७२६.७४ | २.००% जास्त दराने |
| ०३. | श्री.निवृत्ती एल सुर्यवंशी | ३६००६०१.०६ | ५.००% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा<br>दि.२१/०४/२०१८ विषय क्र.३७२ |

तरी विषयाकिंत काम ठेकेदार श्री.महेश इन्टरप्राईजेस यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.३४,२९,१४३.८६/- पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी /शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८१ महाजन कॉलनी सिडको एन-२ येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा मैदानावर कचरा प्रक्रीया करण्यासाठी कॉंक्रीट प्लॅटफॉर्म बसविणे तसेच रस्ता तयार करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.महेश इन्टरप्राईजेस यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.३४,२९,१४३.८६/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी /शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद